**महाराष्ट्र शासन**

संलेको २०१७/ प्र.क्र. ८४ /कोषा प्रशा २

वित्त विभाग,
मादामकामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दि. १०/५/२०१८.

**प्रति,**

**१) श्री. सतिश शिवाजीराव तडकसे २) श्री. संजय चंद्रकांत शहा ३) श्री. बाळासाहेब रामनाथ घोरपडे**
**४) श्री. नारायण भास्कर रिंगणे ५) श्री. श्रीकिशन चुन्नीलाल श्रीरंगम ६) श्री. राजेंद्र धर्मराज मडके**
**७) श्री. बिभीषण व्यंकटराव तांबडे ८) श्री. चं. बा. बिवलकर**

विषय :- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संचालक संवर्गात सन २०१७-२०१८ मध्ये पदोन्नतीने पदे भरण्यासाठी निवडसुची तयार करण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संचालक संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याच्या अनुषंगाने आस्थापना मंडळाकडून आपला सन २०१७-१८ च्या संचालक संवर्गाच्या तात्पुरत्या निवडसुचीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

२. संचालक संवर्गातील पदोन्नतीने पदस्थापनेकरीता शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही- २०१५/ प्र.क्र. १५६/ का- १२, दि. २८/४/२०१५ व दि. १६/७/२०१५ तसेच दि. १५/६/२०१७ अन्वये करण्यात आलेली दुसरी सुधारणा यामधील तरतुदी विचारात घेवून, आपला महसुली विभागाकरीताचा पसंतीक्रम ७ दिवसांचे आत आवश्यक त्या कागदपत्रासह शासनास सादर करावा. विहित मुदतीत विकल्प प्राप्त न झाल्यास नियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. विकल्प मागविण्याचा विहित नमूना सोबत जोडला आहे.

३. सदरचे पत्र व विकल्प मागविण्याचा विहित नमूना www.mahakosh.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून, त्याकरीता स्वतंत्र पत्र निर्गमित केले जाणार नाही. यांची कृपया नोंद घ्यावी. संबंधित अधिकाऱ्यांनी आपले विकल्प shubhangi.sheth@nic.in / ad.admin@mahakosh.in या ई-मेल वर किंवा प्रत्यक्ष कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई या कार्यासनात सादर करावेत.

४. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संचालक संवर्गातील रिक्त पदांची महसुली विभागनिहाय स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| महसूल विभाग | रिक्त पदसंख्या |
|---|---|
| नागपूर | ०१ |
| अमरावती | ०० |
| औरंगाबाद | ०१ |
| नाशिक | ०२ |

| | |
|---|---|
| कोकण- १ | ०० |
| कोकण- २ | ०५ |
| पुणे | ०१ |

(शुभांगी शेठ)
सहसचिव, वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई.

प्रत :- संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

*(सदरचे पत्र व विकल्पाचा मसुदा आजच www.mahakosh.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही संचालनालयाने करावी.)*